IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 02 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# महात्मा बसवेश्वर: सामाजिक आणि वैचारिक क्रांतीचे प्रणेते

**प्रा. अभिजीत गौतम घाडगे**
अर्धनारी नटेश्वर महाविद्यालय, वेळापूर

**Article Info**

***Article History:***
Received: 20th February 2026
Accepted: 01st March 2026
Published: 07th March 2026

***Keywords:***
*सामाजिक आणि वैचारिक, स्त्रियोद्धार आणि समानता, यज्ञसंस्कृती आणि हिंसाचाराचा निषेध, सामाजिक क्रांतीविचार व कार्य*

**ABSTRACT**

भारतात अनेक संत-महात्मे, तपस्वी, विद्वान, ज्ञानमहर्षी, विचारवंत आणि समाजधुरीण होऊन गेले. या थोर व्यक्तींनी ज्या काळात आपले विचार मांडले, त्या काळात त्यांना जितके अनुयायी लाभले, तितकेच प्रबळ विरोधही लाभले. ज्यांनी काळाच्या पुढचा विचार मांडला, त्यांना तत्कालीन बुरसटलेल्या सनातनी प्रवृत्तींनी तीव्र विरोध केला.

दुर्दैवाने, अशा थोर संतांच्या आणि समाजसुधारकांच्या निधनानंतर, त्यांना 'देवत्व' बहाल करून त्यांच्या मूळ विचारांचा गाभाच भ्रष्ट करण्याचा प्रयत्न झाला. त्यांच्या क्रांतिकारी शिकवणुकीत सनातनी विचारांची आणि कर्मकांडांची भेसळ करून, समाजात जे अपेक्षित बदल घडणे अपेक्षित होते, ते रोखले गेले. थोडक्यात सांगायचे तर, सनातनी विचारधारा कोणताही मूलगामी विचार सहजपणे स्वीकारत नाही; उलट ती आपल्याच बुरसटलेल्या कल्पना लादून समाजाची अधोगती होईल अशा गोष्टींत जनसामान्यांना गुंतवून ठेवते, हा इतिहासाचा आजवरचा दाखला आहे. अशाच महामानवांच्या मांदियाळीत काळाशी झुंजणारे एक महान व्यक्तिमत्व, महान दार्शनिक विचारवंत, साधुपुरुष आणि थोर समाजसुधारक म्हणजे महात्मा बसवेश्वर!

***Plagiarism Check Report:***
Date of Report: March 01, 2026
Similarity Index: 3%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite: Ghadge, Abhijit Gautam.** (2025). महात्मा बसवेश्वर: सामाजिक आणि वैचारिक क्रांतीचे प्रणेते. *IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 2(I), **282–286**.

**प्रस्तावना**

भारतात अनेक संत-महात्मे, तपस्वी, विद्वान, ज्ञानमहर्षी, विचारवंत आणि समाजधुरीण होऊन गेले. या थोर व्यक्तींनी ज्या काळात आपले विचार मांडले, त्या काळात त्यांना जितके अनुयायी लाभले, तितकेच प्रबळ विरोधही लाभले. ज्यांनी काळाच्या पुढचा विचार मांडला, त्यांना तत्कालीन बुरसटलेल्या सनातनी प्रवृत्तींनी तीव्र विरोध केला.

दुर्दैवाने, अशा थोर संतांच्या आणि समाजसुधारकांच्या निधनानंतर, त्यांना 'देवत्व' बहाल करून त्यांच्या मूळ विचारांचा गाभाच भ्रष्ट करण्याचा प्रयत्न झाला. त्यांच्या क्रांतिकारी शिकवणुकीत सनातनी विचारांची आणि कर्मकांडांची भेसळ करून, समाजात जे अपेक्षित बदल घडणे अपेक्षित होते, ते रोखले गेले. थोडक्यात सांगायचे तर, सनातनी विचारधारा कोणताही मूलगामी विचार सहजपणे स्वीकारत नाही; उलट ती आपल्याच बुरसटलेल्या कल्पना लादून समाजाची अधोगती होईल अशा गोष्टींत जनसामान्यांना गुंतवून ठेवते, हा इतिहासाचा आजवरचा दाखला आहे. अशाच महामानवांच्या मांदियाळीत काळाशी झुंजणारे एक महान व्यक्तिमत्व, महान दार्शनिक विचारवंत, साधुपुरुष आणि थोर समाजसुधारक म्हणजे महात्मा बसवेश्वर!

**महात्मा बसवेश्वरांचे प्रारंभिक जीवन आणि आध्यात्मिक जडणघडण:**

महात्मा बसवेश्वरांचा जन्म १२ व्या शतकाच्या पूर्वार्धात (इ.स. ११३१) कर्नाटकातील बागेवाडी येथे एका सुसंस्कृत शैव ब्राह्मण कुटुंबात झाला. मादिराज आणि मादलांबिका यांचे सुपुत्र असलेल्या बसवण्णांनी बालपणापासूनच प्रस्थापित कर्मकांडांना आव्हान देण्यास सुरुवात केली होती, असे अनेक आख्यायिकांवरून सांगण्यात येते. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे त्यांनी नाकारलेला 'उपनयन संस्कार'. केवळ परंपरेने चालत आलेल्या रीतीरिवाजांपेक्षा आत्मिक शुद्धी महत्त्वाची आहे, हे त्यांनी बालपणीच ओळखले असावे. कुडलसंगम येथील कृष्णा आणि मलप्रभा नद्यांच्या पवित्र संगमावर त्यांनी जातवेद शिवाचार्यांच्या मार्गदर्शनाखाली 'इष्टलिंगदीक्षा' घेतली आणि खऱ्या अर्थाने त्यांच्या आध्यात्मिक प्रवासाला सुरुवात झाली. पुढे सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढ्यातून सुरू झालेला हा प्रवास बसवकल्याणच्या बिज्जल राजाच्या दरबारात महत्त्वाच्या पदापर्यंत पोहोचला. एक सामान्य कारकून ते राज्याचा 'महामंत्री' आणि 'कोशागार प्रमुख' ही त्यांची वाटचाल त्यांच्या प्रशासनिक कौशल्याची व त्यांच्या प्रामाणिकपणाची आणि प्रगल्भ विद्वत्तेची साक्ष आहे.

**बसवेश्वरांचे सामाजिक क्रांतीविचार व कार्य:**

बसवेश्वरांनी जातीव्यवस्थेची उतरंड नाकारण्यासाठी 'कक्कैय' (ढोर समाज), 'मधुवय्या' (ब्राह्मण) आणि 'हरळप्पा' (चांभार समाज) अशा विविध स्तरांतील अनुयायांना एकत्र आणले. हा एक अत्यंत क्रांतिकारी बदल म्हणावा लागेल. या सर्वांना लिंगदीक्षा देऊन गळयात लिंग धारण करण्यास सांगितले जात असे. एकदा लिंग धारण केले की सारे 'शरण' किंवा 'लिंगायत' म्हणून ओळखले जात. या सर्व लोकांना आपले चिंतन, मनन, विचार एकत्र मांडता यावे म्हणून महात्मा बसवेश्वरांचे क्रांतिकारी पाऊल म्हणजे त्यांनी बसवकल्याण येथे स्थापन केलेला 'शिवानुभव मंटप' (अनुभव मंटप). ही केवळ एक धार्मिक संस्था नव्हती, तर ती सामाजिक समतेची एक अद्वितीय प्रयोगशाळा होती. या व्यासपीठावर केवळ विद्वान पुरुषच नाही तर महिलांचाही मोठ्या प्रमाणात समावेश होता.

बसवेश्वरांनी तत्कालीन सनातनी समाजव्यवस्थेला दिलेले सर्वात मोठे आव्हान म्हणजे एका ब्राह्मण कन्या मधुवरस आणि चर्मकार पुत्र हरळय्या यांचा विवाह. हा बसवेश्वरांच्या सर्वात धाडसी सामाजिक प्रयोगांपैकी एक आहे. परंतु मधुवरस आणि हरळय्या यांनी लिंग धारण केले होते, ते आता शरण आणि शरणी झाले होते. त्यांची जात नाहीशी होऊन ते लिंगायत झाले होते. बसवेश्वरांना हेच अपेक्षित होते; म्हणून त्यांनी त्या दोघांचा विवाह केला. पण तत्कालीन सनातनी समाज शरणांना जातीसंस्थेत बद्ध पाहत होता. बसवेश्वरांची विशाल दृष्टी समजणे त्यांच्या आवाक्याबाहेर होते. वैदिक काळात अनुलोम व प्रतिलोम दोन्ही विवाह होत असत. यातूनच वर्णसंकर थांबवण्यासाठी आणि प्रतिलोम विवाहांवर बंदी येण्यासाठी उच्चवर्णीय स्त्री व निम्नवर्गीय पुरुष यांच्या अपत्याला चांडाळ, क्षत्तर, अयोगव इत्यादी खालच्या समजल्या जाणाऱ्या जातींची निर्मिती केली होती. बसवेश्वरांनी वर्ण व जातीही नाकारून 'शरण' आणि 'शरणी' हीच स्त्री-पुरुषांना संबोधणारी विशेषणे दिली. महाराष्ट्रात मंगळवेढा भागात मरवडे वगैरे

गावांत महार, नवबौद्धांची आडनावे 'शिवशरण' आहेत. ही बसवेश्वरांच्या १२ व्या शतकातील क्रांतीला ध्वनित करणारी नावे आहेत.

बसवेश्वरांनी जरी शरण-शरणींचा विवाह केला, तरी रूढीवादी समाज याला मान्यता देणार नव्हता. बसवण्णांनी आंतरजातीय विवाहाचा एक सामाजिक चमत्कार १२ व्या शतकात केला. तत्कालीन सनातनी मंडळींनी याविरुद्ध राजाचे कान भरले. त्या कालखंडातील राजकर्ते रूढी-परंपरांचे वाहक आणि चातुर्वर्ण्याचे अभिमानी संरक्षक म्हणवून घ्यायचे. या आंतरजातीय विवाहातील ब्राह्मण मुलीचे माता-पिता आणि चर्मकार मुलाचे माता-पिता यांचे डोळे काढण्यात आले आणि नवदांपत्याला त्या काळातील संस्कृतीच्या रक्षकांनी हत्तीच्या पायी दिले. या आसुरी कृत्यानंतर शरणांनी प्रतिकाराचा प्रयत्न केला, परंतु तो मोडून काढण्यात आला. या सर्व गदारोळाने बसवेश्वर व्यथित झाले आणि मनशांतीसाठी ते कुडलसंगम येथे गेले. यानंतर शरणांनीही कल्याण सोडले आणि ते इतरत्र पांगले. काही काळानंतर बसवेश्वरांचे इ.स. ११६७ मध्ये वयाच्या केवळ छत्तीसाव्या वर्षी निर्वाण झाले. भारतात अनेक संत-महात्मे झाले, पण जाती-पातीच्या भिंती ते पाडू शकले नाहीत; कारण इथला शासक वर्गच या विकृतीचा वाहक आणि संरक्षक होता.

**बसवेश्वरांचे क्रांतिकारी विचार**

**अ) वेदप्रामाण्याचा त्याग आणि 'अनुभवप्रामाण्य'**

भारतीय तत्त्वज्ञानात वेदांना अंतिम सत्य मानले जाते, मात्र बसवेश्वरांनी ही वेदप्रामाण्यता निःसंकोचपणे नाकारली. त्यांनी विवेकनिष्ठ भूमिकेतून विसंगतीवर बोट ठेवले. ते म्हणतात:

"मी विष्णूला मानू का श्रेष्ठ?
पण, तो तर वैतागला दहा अवतारांत.
मी वेदांना मानू का सर्वोच्च?
पण, त्यांना तर प्राणिहत्येची आस...
मी शास्त्रांना मानू का उत्तम?
पण, ती तर अतिपाल्हाळिक.
मी पुराणांग तरी मानू का...?
पण, ती तर पूर्वजन्मकर्मात गुरफटलीत.
एकटाच तू स्वयंभू, एकटाच तू परिपूर्ण परमेश्वर
तुला नच पर्याय हे कूडलसंगमेश्वर."

या वचनात ते वेदप्रामाण्य, पुनर्जन्म, प्राणीहत्या, पोथीनिष्ठा या सर्वांना विरोधक ठरणारी भूमिका मांडतात. येथे ते एकेश्वरवादाला महत्त्व देताना दिसतात. १२ व्या शतकात असे विचार मांडणे क्रांतिकारीच म्हणावे लागेल.

**ब) बहुदेवतावाद आणि मूर्तिपूजेचे खंडन**

जडवस्तूंच्या पूजेत अडकलेल्या समाजाला बाहेर काढण्यासाठी त्यांनी 'एकेश्वरवादाचा' पुरस्कार केला. ते म्हणतात:

"देव असे एकची एक तया नावे जरी अनेक
परम पतिव्रतेचे चित्त केवळ पतिठायी असे रत
काय म्हणू तयांना? आचरती जे व्यर्थ बहुदेवउपासना
नाना दैवत पूजती साधक होईल जीवन तयांचे निरर्थक
तू तर एकच ईश्वर हे कूडलसंगमेश्वर."

जेव्हा बहुदेवतावादाचे स्तोम होते, इस्लामचे आगमन झाले नव्हते, अशा काळात बसवण्णा बहुदेवतावाद, सामाजिक भेदभाव, मूर्तिपूजा इत्यादींबाबत भाष्य करत होते. भारतात इंग्रजी विद्येचा प्रसार होऊन प्रबोधन चळवळ आकाराला आली. 'हे

असे का?', 'हे चुकीचे आहे' असे प्रश्न भारतीयांना इंग्रजांच्या आगमनानंतर पडू लागले. पण याला अनेक अपवाद आहेत. महात्मा बसवेश्वर, संत कबीर, तुकाराम महाराज इत्यादी संतांनी आपला विवेक जागृत ठेवून आपापल्या शैलीत व्यवस्थेला प्रश्न विचारले, समाजातील विसंगती ते मांडत राहिले. पण त्यांच्या कार्याला काळाची मोठी सीमा होती. ते आपले मुक्त विचार ज्या काळात मांडत होते, तो काळ परिवर्तनाचा नव्हता. बहुजनांची समाजक्रांती युरोपियन तत्त्वज्ञानाच्या बळाने अधिक विकसित झाली.

**क) यज्ञसंस्कृती आणि हिंसाचाराचा निषेध**

भगवान गौतम बुद्ध आणि वर्धमान महावीरांप्रमाणे बसवेश्वरांनी प्राणीमात्रांच्या हिंसेला विरोध केला. यज्ञातील पशूबळीच्या हिंसेला त्यांनी तीव्र विरोध केला. बळीसाठी नेल्या जाणाऱ्या बोकडाची व्यथा मांडताना ते म्हणतात:

"मंत्र म्हणत म्हणत पहा, देती तुला बळी
अरे बोकडा तू रड, वेद वाचणाऱ्यांपुढे रड,
शास्त्रपुराणे श्रवण करणाऱ्यांपुढे तू रड.
तुझ्या रडण्याने तरी बळी देणाऱ्यांना करील शासन कूडलसंगमदेव."

बसवेश्वरांच्या या विचारांमागे दया आणि करुणा ही चिरंतन मानवी तत्त्वे आहेत. तत्कालीन सनातनी विकृतींशी लढताना त्यांच्या शब्दांना विद्रोहाची धार होती असे वाटू शकते, पण ती धार विद्रोहापेक्षा श्रद्धेची अधिक होती. मानवी जीवन सफल करण्यासाठी केवळ शिवचैतन्याला शरण जा, असाच संदेश त्यांच्या विचारांतून प्रतीत होतो.

**ड) सामाजिक समता आणि जातीय उतरंडीचे उच्चाटन करणारे विचार:**

बसवण्णांनी सिद्ध केले की जात ही जन्मावर नव्हे तर कर्मावर आधारित आहे. जातीसंस्थेवर त्यांनी केलेले भाष्य अचंबित करते. त्या काळात असा विवेकी विचार बसवण्णा मांडत होते:

"लोखंड तापविणारा झाला लोहार, धुणी धुणारा झाला परीट,
वस्त्र विणणारा झाला विणकर, वेद वाचणारा झाला ब्राह्मण.
कानातून जन्मला का कोणी या जगात?
जो जाणतो हे सत्य तोचि एक कुलवंत...
जातपात म्हणजे तरी काय? जातपात हवीच कशाला?
सकल जीवात्म्यांचे जो चिंती कल्याण तोचि खरा कुलवंत
तोचि खरा शरण हे कूडलसंगमदेवा."

वरील वचनात 'जातपात म्हणजे तरी काय? जातपात हवीच कशाला?' हे अत्यंत विद्रोही दोन प्रश्न ते विचारतात ! बसवेश्वरांचे काही विचार कोड्यात टाकतात. १२ व्या शतकात इतक्या प्रगल्भतेने एक सत्पुरुष विवेकाच्या कसोटीवर आणि श्रद्धेच्या बळावर हा प्रश्न विचारतोय. 'सकल जीवात्म्यांचे जो चिंती कल्याण तोचि खरा कुलवंत' या त्यांच्या विचारात समतादृष्टी ओतप्रोत भरली आहे. बसवेश्वर १२ व्या शतकातील एक चमत्कार म्हणावे लागतील. त्यांच्या वाणीला तुकाराम महाराजांसारखी धार होती. त्यांचा उपरोध बोचरा होता. ते कधी शांत भावनिक कवी वाटतात, तर कधी तिखट प्रश्न करतात.

**४. समाजक्रांतीचा केंद्रबिंदू: स्त्रियोद्धार आणि समानता**

"समाजोद्धारासाठी स्त्रियोद्धार अपरिहार्य आहे" हे बसवेश्वरांचे क्रांतिकारी सूत्र होते. त्यांनी स्त्रियांना 'विटाळ' आणि 'अपवित्रतेच्या' साखळ्यांतून मुक्त केले. 'अनुभव मंटप'मध्ये स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने चर्चासत्रांत स्थान दिले. विद्वान पुरुषांबरोबर अक्कमहादेवी, सत्यक्का आणि नागम्मा यांसारख्या विदुषी महिलाही तत्त्वज्ञानावर प्रखर भाष्य करत असत. डॉ. निर्मलकुमार फडकुले म्हणतात त्याप्रमाणे, शतकानुशतके शूद्रांच्या बरोबरीने मानल्या गेलेल्या स्त्रीच्या जीवनाला बसवेश्वरांनी

सिंहगर्जनायुक्त प्रतिष्ठा मिळवून दिली.

बसवेश्वरांना ही दृष्टी शैव तत्त्वज्ञानातील माता पार्वतीच्या स्थानाकडे पाहून आली असावी. सनातनी वर्गाने स्त्रीला आध्यात्मिक उन्नतीपासून, उपनयनापासून, ज्ञानापासून आणि विचार व्यक्त करण्याच्या अधिकारापासून वंचित ठेवले होते. बसवेश्वरांनी स्त्रियांना विचार व्यक्त करण्याचा, चिंतन करण्याचा आणि आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग मिळवून दिला.

**समारोप**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या सविस्तर अभ्यासावरून हे स्पष्ट होते की, महात्मा बसवेश्वर हे केवळ एका धार्मिक पंथाचे संस्थापक नसून ते मध्ययुगीन भारताचे सर्वात मोठे सामाजिक आणि वैचारिक क्रांतिकारक विचारवंत देखिल होते. त्यांनी वेदप्रामाण्यापेक्षा 'अनुभवप्रामाण्याला' आणि ग्रंथप्रामाण्यापेक्षा 'माणसाला' केंद्रस्थानी मानले. मात्र, इतिहासाचा हा एक खेदजनक दाखला आहे की, जेव्हा जेव्हा महापुरुषांनी काळाच्या पुढचे क्रांतिकारी विचार मांडले, तेव्हा त्यांना प्रस्थापित सनातनी आणि बुरसटलेल्या प्रवृत्तींनी तीव्र विरोध केला. दुर्दैवाने, अशा महान समाजसुधारकांच्या निधनानंतर, त्यांच्या विचारांशी लढणे अशक्य झाल्यावर, सनातनी विचारधारेने त्यांना 'देवत्व' बहाल करण्याची चाल खेळली. त्यांना देवाच्या रूपात मंदिरात बंदिस्त करून, त्यांच्या मूळ विचारांचा गाभा भ्रष्ट करण्यात आला. ज्या क्रांतिकारी शिकवणुकीने समाजातील जातीव्यवस्था आणि कर्मकांडांना सुरुंग लावला होता, त्याच शिकवणुकीत पुन्हा सनातनी कर्मकांडांची भेसळ करून जे सामाजिक परिवर्तन अपेक्षित होते, ते रोखले गेले. ही प्रवृत्ती समाजाला प्रगतीऐवजी अवनतीकडे नेणारी आहे, हे बसवेश्वरांच्या चळवळीच्या उत्तरकाळाकडे पाहताना प्रकर्षाने जाणवते.

महात्मा बसवेश्वरांनी 'शिवानुभव मंटप'च्या माध्यमातून स्त्री-पुरुष समानता, जातीभेद निर्मूलन आणि श्रमाची प्रतिष्ठा या त्रिसूत्रीवर आधारित जो समतावादी समाजाचे स्वप्न पाहिले होते, ते स्वप्न आजच्या आधुनिक लोकशाहीचा मूळ आधार आहे. त्यांनी स्त्रियांना 'विटाळ' आणि 'गौणत्व' यांसारख्या बेड्यांतून मुक्त करून त्यांना वैचारिक नेतृत्वाचे स्थान दिले. आज २१ व्या शतकातही आपण ज्या सामाजिक समतेचा शोध घेत आहोत, तिचे मूळ बसवेश्वरांच्या 'वचन साहित्यात' आढळते. जरी सनातनी विचारधारेने आपल्या बुरसटलेल्या कल्पना लादून त्यांच्या मूळ क्रांतीला संकुचित करण्याचा प्रयत्न केला असला, तरी बसवेश्वरांनी मांडलेली 'मानवतावादाची' मूल्ये आजही तितकीच शाश्वत आहेत. त्यांच्या विचारांची शुद्धता ओळखून, कर्मकांडांची भेसळ नाकारणे आणि त्यांच्या समतावादी क्रांतीचा गाभा पुन्हा जनमानसात रुजवणे, हीच खऱ्या अर्थाने वर्तमानकाळाची गरज आहे. "सकल जीवात्म्यांचे जो चिंती कल्याण, तोचि खरा कुलवंत" हा त्यांचा विचारच मानवी संस्कृतीचा अंतिम निष्कर्ष ठरतो.

**संदर्भ ग्रंथसूची**

१. देशमुख, गोपाळराव; दोन राजधान्या मंगळवेढा ब्रह्मपुरीचा इतिहास, कौशल्या प्रकाशन, प्रथम आवृत्ती (२०१४)
२. थापर, रोमिला; अर्ली इंडिया (Early India), के. सागर पब्लिकेशन्स
३. श्रीमाऊलीसुत प्रकाश; आपली संस्कृती, आवृत्ती १२ वी (२००८)
४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर; शूद्र पूर्वी कोण होते?, प्रबुद्ध भारत पुस्तकालय आणि प्रकाशन व्यवसाय
५. भगत, रा. तु. (संपा.); संतसाहित्य आणि समाजप्रबोधन, दिलीपराज प्रकाशन.
६. तिप्पेरुद्रस्वामी, एच.; भारतीय साहित्याचे निर्माते: बसवेश्वर, (अनु. रोहिणी तुकदेव), साहित्य अकादेमी.